महाराष्ट्र शासन
शिक्षण उपसंचालक कार्यालय
नाशिक विभाग, नाशिक
विभागीय आयुक्त कार्यालय आवार, नाशिक रोड, नाशिक
फोन नंबर ०२५३ २४५४८६५, ईमेल: dydenshesl@yahoo.com

जा.क्र.शिउसं/नावि/माध्य-२/अं.प./मुंजवाड/२०२२ / 10479 / 92 दिनांक १४/८/२०२३

स्वयंअर्थसहाय्यित शाळा (अंतिम परवानगी)

प्रति,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नंदुरबार

विषय :- सौ. मीना किशोर दराडे एज्युकेशन सोसायटी संचलित एम. के. डी. इंग्लिश मेडियम स्कूल, गट क्र.५७, विरचक ता. जि. नंदुरबार या शाळेस अंतिम परवानगी देणेबाबत..
(माध्यम - इंग्रजी सी.बी.एस.ई इयत्ता - १ ली ते १२ वी सर्व शाखा) (स्वयंअर्थसहाय्यित शाळा)

संदर्भ : १) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम- २०१२
२) शासन निर्णय क्र.एसएफएस/२०२३/प्र.क.१३७/एसएम-२ दि. १६ फेब्रु. २०२३ व दि.१९ जुन २०२३
३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प.नाशिक यांचे कडील पत्र क्र.जिपनं/खाप्राशा/स्वयंअर्थसहाय्यित शाळा/४७६/२३ दिनांक २१/७/२०२३

उपरोक्त विषयाबाबत आपण संदर्भिय पत्र क्र. ३ अन्वये सौ. मीना किशोर दराडे एज्युकेशन सोसायटी संचलित एम. के. डी. इंग्लिश मेडियम स्कूल, गट क्र.५७, विरचक ता. जि. नंदुरबार या शाळेस अंतिम परवानगी मिळणेचा प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला आहे.

सदर प्रस्ताव पाहता, सौ. मीना किशोर दराडे एज्युकेशन सोसायटी संचलित एम. के. डी. इंग्लिश मेडियम स्कूल, गट क्र.५७, विरचक ता. जि. नंदुरबारया शाळेस महाराष्ट्र स्वयंअर्थ सहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम-२०१२ अंतर्गत संदर्भिय शासन निर्णय क्र. २ अन्वये इ.१.ली ते इ.१२ वी पर्यंत मराठी माध्यमासाठी शाळेस मान्यता मिळालेली आहे. संबंधित संस्था संचलित शाळेने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून इ. १ ली ते १२ वी, इंग्रजी माध्यम (सी बी.एस.ई. सर्व शाखा) सुरु केलेली आहे. त्याअनुषंगाने सौ. मीना किशोर दराडे एज्युकेशन सोसायटी संचलित एम. के. डी. इंग्लिश मेडियम स्कूल, गट क्र.५७, विरचक ता. जि. नंदुरबारया शाळेस अंतिम परवानगी मिळणेचा प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला आहे. सदर प्रस्ताव पाहता, सौ. मीना किशोर दराडे एज्युकेशन सोसायटी संचलित एम. के. डी. इंग्लिश मेडियम स्कूल, गट क्र.५७, विरचक ता. जि. नंदुरबार.या शाळेस माध्यमिक शाळा संहितेच्या नियमानुसार सन २०२३-२४ पासून संबंधित स्वयंअर्थसहाय्यित शाळेसाठी अंतिम परवानगी देण्यात येत आहे. त्याप्रमाणे खालील बाबींची पूर्तता करण्याच्या अटी/शर्तीवर सदरची अंतिम परवानगी देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती -**

१. संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या शाळेचे, संस्थेने शाळा परवानगीसाठी प्रस्तावित केलेले माध्यम व शाळेचे प्रस्तावित केलेले ठिकाण, इत्यादीमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही. तसेच भविष्यात या शाळेचे, अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

२. प्रस्तुत शाळेला या कार्यालयाकडून अंतिम परवानगी मिळाल्यानंतर, त्यातील अटी व शर्तींच्या पूर्तता करुन शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि. प. नंदुरबार यांना अहवाल सादर करावा लागेल. त्या अहवालानुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी शाळेची तपासणी केल्यानंतर, विहीत नमून्यात प्रथम मान्यता प्रस्ताव शिफारशीसह तथा आवश्यक कागदपत्रांसह या कार्यालयाकडे सादर करावा लागेल.

३. तसेच सन २०२३-२४ पासून त्या शाळा सुरू करता येईल. त्या नंतरचे वर्ग नैसर्गिक वाढीने टप्प्या-टप्प्याने सुरू करता येतील.

Antim parvangi letter

Sau.Mina Kishor Darade Education Society's ... English Medium School (CBSE) Nandurbar 425412

Principal
M.K.D. ... Medium ... (CBSE)

४. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे. त्या वर्गाव्यतिरीक्त इतर वरचे वर्ग सुरू करता येणार नाही. त्याखेरीज सुरू केलेले वरचे वर्ग अनधिकृत मानले जातील.

५. आपल्या शाळेतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांनी महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवाशर्ती) विनियमन अधिनियम १९७८ व नियमावली १९८१ यामधील नियम तसेच वेळोवेळी होणारे बदल लागू राहतील.

६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थ सहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

७. यापूर्वी राष्ट्रीयकृत बँकेत विहीत रक्कम बचत प्रमाणपत्र/मुदत ठेव, ठेवलेली नसल्यास त्याबाबत पूर्तता करण्यात आली नसल्यास, प्रथम मान्यता/परवानगी प्रस्ताव सादर करतांना राष्ट्रीयकृत बँकेतील ठेवी आपल्या जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी माध्यमिक व संस्थांचे (एकत्रित खात्यावर) मूळ बचत प्रमाणपत्र/मुदत ठेव पावतीची प्रत जमा करणे आवश्यक राहील. संदर अटीची पूर्तता प्रस्तावासोबत न झाल्यास प्रथम मान्यता नाकारण्यात येईल.

८. या पत्रान्वये जी शाळा सुरु करण्यास परवानगी दिल्याचे कळविण्यात आलेले आहे, त्याप्रमाणे शाळा सुरु करुन सक्षम प्राधिकाऱ्याकडून माध्यमिक शाळा संहिता नियम-१९८६ च्या ३.२ प्रमाणे विहीत नमून्यात अर्ज करुन मान्यता न घेतल्यास आपली सुरु असलेली शाळा अनाधिकृत (मान्यता नसलेली शाळा) समजण्यात येईल.

९. भविष्यात स्वयंअर्थ सहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम-२०१२ अंतर्गत शाळा सुरू करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावासोबतची कागदपत्रे विधीग्राह्य नसल्याचे निष्पन्न झाल्यास, शासन निर्णय दिनांक १५/६/२०१३ अन्वये देण्यात आलेली परवानगी तसेच इरादा पत्रासह पूढील मान्यता विषयक कार्यवाही रद्दबातल समजण्यात येईल.

१०. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता <u>स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा / वर्ग</u> असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील. संस्थेने संबंधित अधिकाऱ्यांशी/पालकांशी पत्रव्यवहार करतांना लेटरहेडवर स्वयंअर्थ सहाय्यित शाळा / वर्ग असे लिहिणे बंधनकारक राहील.

११. महाराष्ट्र स्वयंअर्थ सहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम-२०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरतांना स्वयंअर्थ सहाय्यित शाळा/वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

१२. सदरच्या शाळा चालविण्याबाबत शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले सर्व प्रचलित नियम व भविष्यात शासन वेळोवेळी विहित करेल अशा सर्व नियमांची अंमलबजावणी करणे, संस्थेवर तसेच शाळेवर बंधनकारक राहील.

१३. माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३.१ नुसार आपण शाळेच्या प्रथम मान्यतेबाबत अर्ज माध्यमिक शाळा संहितेतील विवरणपत्र दोन मधील नमून्यात दोन प्रतीत शाळा सुरु केलेल्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत आपल्या जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे करावा व त्याची एक प्रत या कार्यालयास द्यावी म्हणजे पुढील कार्यवाही करणे सोयीचे होईल.

(डॉ.बी.डी.चव्हाण)
शिक्षण उपसंचालक,
नाशिक विभाग,नाशिक

प्रत माहिती व कार्यवाहीस्तव -

१. म. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नाशिक विभाग, नाशिक
२. अध्यक्ष/सचिव, सौ. मीना किशोर दराडे एज्युकेशन सोसायटी नंदुरबार
३. मुख्याध्यापक, एम. के. डी. इंग्लिश मेडियम स्कूल. गट क्र.५०७ विरचक ता. जि. नंदुरबार



Smt. Mina Kishor Darade Education Society's Nashik — English Medium School (CBSE) Nandurbar 425412

Principal
M.K.D. English
Medium School (CBSE)
Nandurbar 425412